# प्रस्तावना

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनात कोल्हापूरला वेगळेच असे स्वत:चे वैशिष्टयपूर्ण व महत्वाचे स्थान आहे. इथल्या गादीचा वारसा प्रत्यक्ष छ. शिवाजी महाराज यांच्यापर्यंत पोहोचतो. १७१० साली ताराराणींनी स्वतंत्र गादी स्थापन केल्यापासून ते १९४९ साली झालेल्या सामीलीकरणापर्यंत कोल्हापूरने आपले स्वातंत्र्य टिकवून ठेवले. राजर्षि शाहू महाराजांनी सामाजिक चळवळीस एक नविन दिशा दिली. ब्राम्हणेत्तर चळवळ, सत्यशोधक चळवळ याचे कोल्हापूर हे महत्वाचे केंद्र बनले. याचबरोबर औद्योगिक, शैक्षणिक प्रगती सुध्दा मोठया प्रमाणात होत होती. सांस्कृतिक जीवनात सुध्दा तमाशा, शाहिरी, नाटक, कुस्ती, लाठमारी वगैरे अनेक क्षेत्रात कोल्हापूरने आपले वेगळे वैशिष्टय कायम ठेवले. चित्रपटाने करमणूक - मनोरंजनाचे क्षेत्रात एक नवीन दालन उघडले. कोल्हापूरने देखील या क्षेत्रात पाऊल ठेवून १९१९ ते १९४९ या काळात मोठया प्रमाणात चित्रपट निर्मिती केली. चित्रपट निर्मिती क्षेत्रात कोल्हापूरने नांव मिळविले, हा बदल दूरगामी परिणाम करणारा ठरला.

१९८० च्या दशकात अमिताभ बच्चन, सुनिल दत्त, वैजयंतीमाला या चित्रपट नायक - नायिकांना राजकारणात महत्व आले. तसेच दक्षिण भारतात देखील करुणानिधी, रामचंद्रन यासारख्या चित्रपट क्षेत्रातील व्यक्ति मुख्यमंत्री झाल्या. चित्रपटाचे राजकारणातील वाढते महत्व व प्रभाव यामुळे महाविद्यालयीन दशेतच मी चित्रपटांविषयी विचार करु लागले. कोल्हापूरने या क्षेत्रात आपला ठसा उमटविलेला आहे. या कारणास्तव संशोधन कार्यासाठी मी सदर विषयाची निवड केली.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

या विषयावर प्रसिध्द वाङ्मय कांही प्रमाणात उपलब्ध आहे. ते बहुतांशी आत्मचरित्रपर प्रकारात मोडते. श्री. बाबूराव पेंढारकरांचे " चित्र आणि चरित्र ", श्री. व्ही. शांताराम यांचे " शांतारामा ", श्री. भालजी पेंढारकर यांचे " साधा माणूस ", श्री. गोविंदराव टेंबे यांचे " माझी जीवन विहार ", श्रीमती लीला चिटणीस यांचे " चंदेरी दुनियेत " अशी आत्मचरित्रे उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे श्री. बाबूराव पेंटर यांच्याविषयीचे " कलामहर्षि बाबूराव पेंटर " हे ग. रं. भिडे व बाबा गजबर लिखित पुस्तक उपलब्ध आहे. पण कोल्हापूरातील चित्रपट निर्मितीचा पध्दतशीर अभ्यास झालेला नाही. या माध्यमाच्या सर्वांगावर प्रकाश टाकू शकेल असे लिखाण प्रसिध्द झालेले नाही. म्हणून या विषयाची संशोधन करण्यासाठी निवड केली.

या संदर्भात वरील आत्मचरित्राबरोबरच साप्ताहिक " सत्यवादी " व दैनिक " पुढारी " च्या समकालीन फाईल्स ची व " कोल्हापूर दर्शन " या ग. रं. भिडे संपादीत पुस्तकाची, वसंत साठे यांनी संपादित केलेल्या " चित्रसंपदा " व सुधीर फडके यांनी संपादित केलेल्या " चित्रशारदा " या अंकांची मदत झाली. त्याचबरोबर अप्रकाशित साधनात ए. एस्. गाढवे यांच्या " एंटरटेनमेंट ॲण्ड ॲम्युजमेंटस् डयुरिंग मराठा पिरियड " व डी. ए. माने यांच्या " ग्रोथ ऑफ द प्रेस इन द प्रिन्सली स्टेट कोल्हापूर फ्रॉम १९२२ टू १९४९ " या एम्. फील. च्या शोध प्रबंधाची मदत झाली.

या विषयावरील संशोधन मुख्यत: सहा प्रकरणातून करण्यात आले.

१] चित्रपटाच्या उदयाची पार्श्वभूमी.

२] चित्रपटांचा विकास.

३] चित्रपटाचे आशय.

४] चित्रपट व्यवसाय - आर्थिक व इतर समस्या.

५] चित्रपट क्षेत्रा तील व्यक्तिमत्वे.

६] उपसंहार.

पहिल्या प्रकरणामध्ये चित्रपट निर्मितीत सहाय्यक ठरलेल्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व औद्योगिक व सांस्कृतिक पैलूंचा ठोकळ मानाने आढावा घेतला आहे. चित्रपटांचा उदय हे वैज्ञानिक, तांत्रिक प्रगतीचे फळ आहे. या माध्यमाच्या उदयामुळे करमणुकीच्या क्षेत्रात क्रांती झाली. चित्रपट निर्मितीचा प्रारंभ व विकास यांचा धावता आढावा घेऊन कोल्हापूरात चित्रपट निर्मिती केंव्हा, कशी व का झाली ? याचा विचार या प्रकरणात केला आहे. कोल्हापूरच्या सर्वांगीण पार्श्वभूमीचा आढावा घेताना मला मुख्यत: ग. रं. भिडे व पु. ल. देशपांडे यांनी संपादित केलेल्या " कोल्हापूर दर्शन " व छ. शाहू स्मारक भवनाच्या उद्घाटन प्रसंगी आमदार पी. बी. साळुंखे यांनी संपादित केलेली स्मरणिका या साधनांची खूप मदत झाली. त्याचबरोबर करमणुकीच्या साधनां-विषयी देखील वरील पुस्तकांबरोबरच ए. एस्. गाढवे यांच्या " एंटरटेनमेंट अँड ॲम्युजमेंटस् ड्युरिंग मराठा पिरियड " या एस्. फिल. च्या शोध प्रबंधाची देखील मदत झाली.

दुस-या व तिस-या प्रकरणांमध्ये सालानुसार कोल्हापूरातील चित्रपट संस्थांचा उदय, त्यांनी निर्मित केलेले चित्रपट, त्यातील कलाकारांबरोबर दिग्दर्शक, लेखक, संगीतकार व इतर तंत्रज्ञ यांची सविस्तर माहिती दिली आहे. कोल्हापूरातील चित्रपट संस्थांनी कोल्हापूरातच निर्मित केलेल्या मूकपट व मराठी चित्रपटांचा उल्लेख केला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील इतर ठिकाणच्या चित्रपट निर्मितीची संख्यात्मक तुलना केली आहे. चित्रपटांच्या तांत्रिक प्रगतीचा अभ्यासही यात केला आहे. कोल्हापूरात निर्माण झालेल्या चित्रपटांच्या आशयाची धार्मिक, ऐतिहासिक व सामाजिक अशी त्यात आशया-नुसार चित्रपटांची विभागणी करून प्रत्येक चित्रपटाचा आशय थोडक्यात दिला आहे. यात महाराष्ट्रात इतर ठिकाणी निर्माण झालेल्या चित्रपटांच्या आशयाची

व कोल्हापूरातील चित्रपटांच्या आशयाची तुलना केली आहे. या दोन्ही प्रकरणांसाठी मुख्यत्वे श्री. सुधीर फडके यांनी संपादित केलेल्या " चित्रशारदा " व श्री. वसंत साठे यांनी संपादित केलेल्या " चित्रसंपदा " या अंकांची व श्री. बाबूराव पेंढारकर यांच्या " चित्र आणि चरित्र ", श्री. व्ही. शांताराम यांच्या " शांतारामा " व श्री. भालजी पेंढारकरांच्या " साधा माणूस " तसेच गोविंदराव टेंबे यांच्या " माझा जीवनविहार " या आत्मचरित्रांची व ग. रं. भिडे व बाबा गजबर लिखित " कलामहर्षि बाबूराव पेंटर " या साधनांची महत्वाची मदत झाली.

चौथ्या प्रकरणात चित्रपट निर्मिती करताना येणा-या आर्थिक अडचणी, भांडवलाची उभारणी व चित्रपटावर होणा-या खर्चाबरोबर चित्रपटातून मिळणा-या उत्पन्नाचे ठोकळ मानाने आंकडे दिले आहेत. त्याचबरोबर इतरही अनेक समस्यांचा आढावा घेतला आहे. यासाठी मुख्यत: वर नमूद केलेल्या आत्मचरित्रे व " कलामहर्षि बाबूराव पेंटर " या पुस्तकाबरोबरच " चंदेरी दुनियेत " या लिला चिटणीस या आत्मचरित्राची व श्री. अनंत माने, श्री. वसंत वणकुद्रे, लीला पेंढारकर यांच्या मुलाखतींची मदत झाली.

पाचव्या प्रकरणात कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीतील नावाजलेल्या व्यक्तींच्या जीवन व चित्रपट कारकिर्दीचा आढावा घेऊन लेखन, दिग्दर्शन, संगीत व इतर तांत्रिक विभागात मोलाची कामगिरी केलेल्या व्यक्तिंचा उल्लेख केला आहे. याकरीता श्री. बाबुराव पेंढारकर, श्री. भालजी पेंढारकर व व्ही. शांताराम यांच्या आत्मचरित्रांची व " कलामहर्षि बाबूराव पेंटर " या पुस्तकाबरोबरच " चित्रसंपदा " या अंकाची मदत झाली.

LIBRARY KOLHAPUR

सहाव्या उपसंहार या प्रकरणात कोल्हापूरात चित्रपट निर्मितीस पोषक अशी परिस्थिती, चित्रपटांच्या विकासातील टप्पे व चित्रपटांच्या आशयासंबंधी निष्कर्ष काढले असून तात्कालिन सामाजिक, राजकीय परिस्थितीचे ज्याप्रमाणे वृत्तपत्रे, वाङ्‌मयात दर्शन घडते तसे चित्रपटातही घडले का यासंबंधीचे निष्कर्ष काढले आहेत.

या शोध प्रबंधनाचे लिखाण करताना मला माझे मार्गदर्शक मा. डॉ. एस्. पी. पाटील यांची मोलाची मदत व सहकार्य झाले. त्यांची मी अत्यंत आभारी आहे. त्याचबरोबर " सत्यवादी " चे संपादक श्री. राजकुमार पाटील, " पुढारी " कार्यालयाचे श्री. देशपांडे यांनी सदर विषयाची माहिती गोळा करण्यास दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. सुप्रसिध्द दिग्दर्शक अनंत माने व द. स. अंबपकर, चित्रपट कलाकार सौ. लीला पेंढारकर, सम्राट सिनेटोन चे श्री. वसंत वणकुद्रे यांनी मुलाखतीद्वारा दिलेल्या माहिती-बद्दल मी त्यांची आभारी आहे. चित्रपट महामंडळाने केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. त्याचबरोबर या कामात मला माझे आई, वडील व बंधू यांनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल मी त्यांचे आभार मानते.

Nagarani K.A.
21-12-93